# पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

कक्ष -९ (भरती कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई – ४००००१
दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४ ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/ ८८७ /२०२६, दि. १८/०४ /२०२६.

## मुंबई पोलीस शिपाई भरती २०२४-२५

**विषय :-** मुंबई पोलीस शिपाई भरती २०२४-२५ अंतर्गत लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपाबाबत...

**संदर्भ :-** १) क्र.अपोमसं/प्रशि/कार्यपध्दती/पो.शि.भरती २०२४-२५/२२/२०२६, दि.१९/०१/२०२६
२) जा.क्र.पोआ/कक्ष-९/(पोभ)/९/(१)/८५०/२०२६, दि.१२/०४/२०२६..

मुंबई पोलीस शिपाई भरती २०२४-२५ या पदाची लेखी परिक्षा दिनांक १२/०४/२०२६ रोजी मुंबईतील विविध परीक्षा केंद्र/शाळामध्ये घेण्यात आली होती. सदर लेखी परिक्षेची उत्तर तालिका प्रश्नसंचनिहाय (A, B, C, D) mumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर त्याच दिवशी दिनांक १२/०४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उत्तर तालिकेबाबत उमेदवारांना त्यांचे आक्षेप https://apimbpr.iroams.com/mumbai-objections/ या लिंकवर (Link) दिनांक १४/०४/२०२६ रोजी सायंकाळी २०:०० वाजेपर्यंत नोंदविण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, मुंबई पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेच्या प्रश्नांच्याबाबतीत प्राप्त आक्षेपांची पडताळणी केली असता, उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपांची दखल घेण्यात आली असून, खालील नमूद प्रश्नाचे उत्तर पर्यायामध्ये उपलब्ध नसल्यामुळे सदर प्रश्नाचे १ गुण उमेदवारांना देण्यात येईल.

| प्रश्न संच क्रमांक | प्रश्न क्रमांक | प्रश्नसंचामधील प्रश्न | प्रश्न संचामधील पर्याय | उत्तर तालिकामधील उत्तर | कमिटीने घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| A | 96 | पुढीलपैकी आवृत्तिवाचक विशेषण कोणते? | (A) नेहमी<br>(B) द्वितीया<br>(C) कोठला<br>(D) सगळा | (A) नेहमी | **योग्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे, या प्रश्नासाठी सर्वांना गुण देण्यात येईल.** |
| B | 56 | | | | |
| C | 75 | | | | |
| D | 84 | | | | |

याव्यतिरिक्त ज्या उमेदवारांच्या आक्षेपामध्ये तथ्य आढळून आले नाहीत त्या उमेदवारांचे आक्षेप दप्तरी दाखल करण्यात आले असून, लेखी परीक्षेचे गुण लवकरच mumbaipolice.gov.in या मुंबई पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( नितीन पवार )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२) तथा
सचिव, मुंबई पोलीस शिपाई भरती २०२४-२५
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.

G:\Notification २०२४-२५ Bharti.doc